154 Close

धीरज परब योग्य कार्य. अहवाल

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION


कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

दूरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985

ईमेल : mbmcho@gmail.com वेबसाईट : www. mbmc.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

मुख्य कार्यालय

जा. क्र. मिभा / मनपा /पर्यावरण / ५७/२०२३-२४

दिनांक: १९/०७/२०२३

उप नमक आयुक्त कार्यालय, मुंबई
Office Of The Deputy Salt Commissioner Mumbai
24 JUL 2023
सं./No. 3247

प्रति,

**मा. सदस्य सचिव**

राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष,
३०२, वेक फिल्ड हाऊस, ३ रा मजला,
ब्रिटानिया रेस्टॉरंटजवळ, बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ००१.

**विषय : मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत कांदळवनाची कत्तल व भरणी केल्याबाबतच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अहवाल सादर करणेबाबत.**

**संदर्भ : १.आपलेकडील जा.क्र./ल.ले/कां.स/१०३/सन२०२३ -२४, दि. १३/०६/२०२३ रोजीचे पत्र.**
**२. आपलेकडील जा.क्र./ल.ले/कां.स/१२३/सन२०२३-२४, दि. १३/०६/२०२३ रोजीचे पत्र.**
**३. अपर तहसिलदार-मिरा भाईंदर यांचेकडील क्र.महसूल/कांदळवन/कावि-०६/२०२३, दि. २२/०६/२०२३ रोजीचे पत्र.**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भिय विषयांकित प्रकरणी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विकासक / भूमाफिया यांनी कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेडचे उल्लंघन केल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अनधिकृतपणे बांधकाम तसेच कांदळवन क्षेत्रात करण्यात आलेला मातीभराव हटविण्याचे निर्देश देऊन कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करणेबाबत आपल्या कार्यालयामार्फत कळविले आहे.

तरी प्राप्त तक्रारीं संदर्भात मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल सोबत जोडून देण्यात येत आहे.

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्र. 83
दिनांक 25/7/23
उप वनसंरक्षक

Mangrove Comm.
मुख्य लेखापाल A.O.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :

१. मा. अध्यक्ष, कांदळवन संरक्षण व संवर्धन संनियंत्रण समिती तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## कांदळवनाची कत्तल व भरणी केल्याबाबतच्या प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अहवाल

| अ. क्र. | तक्रार क्रमांक | मुद्दा | अहवाल |
|---|---|---|---|
| १. | १७ | **श्री. धिरज परब**<br>दि.०५/१२/२०१८ सेवन इलेवन हॉटेल कं. ने मीरा रोड कर्नाकिया येथे कांदळवनाची तोड करुन मातीभराव व कुंपण भिंत बांधकाम केल्याबाबत. | सर्व्हे क्र. ५१ हि. क्र. १, २, ४/अ व ४/ब, सर्व्हे क्रमांक ६८ हि. क्रमांक १ व ३ व सर्व्हे क्रमांक ६९ हि. क्र. १ या जागेवर झालेल्या विकासकामांबाबत संबंधितांवर मिरा रोड पोलीस ठाणे येथे प्रभाग समिती कार्यालय क्र. ०४ चे सहा.आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी, यांच्यामार्फत पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम १५ अन्वये गुन्हा रजि. नं. ०२२४/२०२१ दि.१८/०६/२०२१ रोजी गुन्हा दाखल करणेत आलेला आहे. |
| २. | ७६ | **श्री. धिरज परब**<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. | सदर ठिकाणी स्थळ पाहणी केली असता जे.सी.बी. च्या सहाय्याने जमिनीचे सपाटीकरण झाल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच सदरची जमिन कांदळवन क्षेत्राच्या ५० मिटर बफर झोनमध्ये बाधित होत असुन त्या ठिकाणी नव्याने माती भराव व कांदळवन झाडांची कत्तल झाल्याचे आढळुन आलेले नाही. तसेच त्या ठिकाणी जे.सी.बी. च्या सहाय्याने सुकलेली झाडे साफ केल्याचे निदर्शनास आले आहे. |
| ३. | ७७ | **श्री. धिरज परब**<br>मिरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ ऱ्हास करून सीआरझेड चे उल्लंघन. | सदर डेब्रिज / माती भराव काढणेबाबत अंदाजपत्रक तयार करणेचे काम सार्व. बांधकाम विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेमार्फत करण्यात येणार आहे. |
| ४. | १०० | **श्री. धिरज परब**<br>दि.14/10/2019 भाईंदर पश्चिम येथे बजरंग नगर भागात महापालिकेने कांदळवन क्षेत्रात बेकायदेशीर बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केलेबाबत. | भाईंदर प. येथील जय बजरंग नगर, शिवसेना गल्ली येथे असलेले ई-मोबाईल टॉयलेट मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्व. बांधकाम विभागामार्फत हटविण्यात आलेले आहेत. |
| ५. | १०४ | **श्री. धिरज परब**<br>दि.१९/११/२०१९ भाईंदर पश्चिम येथे एसटी डेपोच्या आरक्षणातील कांदळवन नष्ट करुन झाडे तोडणे | सदर जागेवर सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांच्या बसेस पाकींग केली जात असल्याचे व त्या ठिकाणी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ यांचेमार्फत सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आलेले आहेत. |
| ६. | १५४ | **श्री. धिरज परब**<br>भाईंदर पश्चिम येथे गणेश देवलनगर या भागात सरकारी जागेतील वन कायद्याने संरक्षित कांदळवनमध्ये झालेल्या बेकायदेशीर बांधकामावर कारवाई ऐवजी त्यांना संरक्षण व सुविधा देणाऱ्यांवर तसेच बांधकाम करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत | सदर जागेवर असलेली बांधकामे ही फार वर्षापुर्वीचे जुने असल्याचे निदर्शनास येत आहे. तथापी सदरची जागा ही शासकीय व सॉल्ट विभागाची असल्याने सदर जागेवर झालेल्या अनधिकृत बांधकामाबाबत आवश्यक कार्यवाही अथवा निष्कासन कारवाई योजून मिरा भाईंदर महानगरपालिकेस कळविल्यास मनुष्यबळ यंत्रसामुग्री पुरविणेकामी सहकार्य करणेबाबतचे तहसिलदार कार्यालय, मिरा-भाईंदर व सॉल्ट विभागास कळविण्यात आलेले आहे. |

Thane- complaint NO. 154

महाराष्ट्र शासन

अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता : प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०११०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.
दुरध्वनी क्र. ०२२-२८१८५९१६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.महसूल/कांदळवन/तक्रार क्र. १५४ दिनांक : ०१/०३/२०२३

प्रति,

मा. जिल्हाधिकारी, ठाणे
(महसूल शाखा)

विषय :- राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीकडे प्राप्त तक्रार क्र.१५४ बाबत.
श्री. धिरज परब यांचा तक्रारी अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करणेत येते, की मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. धिरज परब दि.२०/११/२०१९ यांनी कांदळवनाच्या / पाणथळाच्या -हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. धिरज परब दि.२०/११/२०१९ |
| २ | तक्रारीचा विषय | भाईंदर पश्चिम येथील गणेश देवल नगर या भागात सरकारी जागेतील वन कायद्याने संरक्षित कांदळवन मध्ये झालेल्या बेकायदेशीर बांधकामाबाबत |
| ३ | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशील उदा. स.क्र. गावाचे नाव, तालुका | मौजे भाईंदर येथील स.क्र. ३४२ सदरचे क्षेत्र कांदळवन अधिसूचित क्षेत्र आहे. |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | वन परिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन), मुंबई |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | ➢ दि.१७/१२/२०२० रोजी स्थळपाहणी करणेत आली<br>➢ तक्रारीतील नमुद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र आहे.<br>➢ सदरचे क्षेत्र कांदळवनापासून ५० मीटर बफर झोन मध्ये येत आहे.<br>➢ सदरचे क्षेत्र सरकारी आहे.<br>➢ सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC MAP नूसार तक्रारीतील नमुद जागेवर काही ठिकाणी कांदळवन दिसून येत आहे. |

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 572
दिनांक 06/03/2023
MAR
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

| | | |
|---|---|---|
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधीत पोलीस स्थानकांचे नाव | गुन्हा रजि. क्र.२३९/२०१७ दि.२३/०६/२०१७ भाईंदर पोलीस स्टेशन |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता | संभाजी पानपट्टे, राजकूमार कांबळे, अरविंद चाळके सर्व रा. भाईंदर पश्चिम |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्यांचे वर्णन | पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ चे कलम १५, १७ व १९ |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा व एफ.आय.आर. च्या प्रतीसह पृष्ट क्रमांक १ ते --- सादर केलेली आहेत.

(सौ. स्मिता गुरव)
नायब तहसिलदार, मिरा-भाईंदर

टिप :- स्थळ प्रतीवर मा. अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांची स्वाक्षरी असे.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव महाराष्ट्र वन विभाग

दूरध्वनीक्र.022-25220097

EmailId:**dfommcu@gmail.com**

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

वनविभाग

**विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक**

**यांचे कार्यालय**

ब- ६८, कामगार नगर, टिळकनगर स्टेशन जवळ, कुर्ला (पुर्व), मुंबई - ४०० ०२४


---

जा.क्र.कक्ष-9/जमिन/2252/सन 2022-23 दिनांक.05/12/2022.

प्रति,

सदस्य सचिव,
राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती,
तथा उप वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष, मुंबई.

**विषय** : श्री. धिरज परब यांच्या कांदळवन तक्रारीबाबत. (तक्रार क्र.154)

**संदर्भ** : 1. आपलेकडील पत्र क्र.ल.ले/समिती/83, दिनांक.22/07/2022.
2. वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांच्याकडील पत्र क्र. ठा.कां/तक्रार/514, दिनांक.06/10/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये श्री. धिरज परब यांनी भाईंदर पश्चिम येथे गणेशदेवल नगर ह्या भागात सरकारी जागेतील संरक्षित कांदळवन तसेच कांदळवन झाडांना काँक्रीटचा पक्का नाला बांधून मोठ्या प्रमाणात नष्ट करुन झालेल्या बेकायदेशीर बांधकामांवर व संबंधित अधिकारी, लाभार्थी आदींवर फौजदारी कारवाई करणेबाबतचा तक्रार अर्ज आपल्यामार्फत या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. त्याअनुषंगाने वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी नमूद जागेची स्थळपाहणी करून संदर्भिय पत्र क्र. 2 अन्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.

1. सदरचे ठिकाण हे भाईंदर पश्चिम येथे गणेशदेवल नगर येथील आहे.
2. तक्रारीमधील नमुद क्षेत्र अधिसुचित कांदळवन क्षेत्र नाही.
3. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे बफर झोन मध्ये येत आहे.
4. तक्रारीमधील नमुद क्षेत्र हे सरकारी आहे. परंतू स.क्र. 342/1 पै चे एकुण 103.8320 हे. भारतीय वन अधिनियम 1927 चे कलम 4 अन्वये अधिसुचित राखीव कांदळवन म्हणुन घोषित झाले आहे.
5. प्रत्यक्ष स्थळपाहणीच्या वेळी प्रत्यक्ष जागेवर घेतलेले जी.पी.एस. रिडींग खालीलप्रमाणे
   1. N 19 18 25.4 E 72 50 46.9 2. N 19 18 25.9 E 72 50 48.8
   3. N 19 18 27.2 E 72 50 42.9 4. N 19 18 26.6 E 72 50 45.7
6. वरील जी.पी.एस. रिडींग गुगल अर्थवर घेऊन MRSAC नकाशावर सुपर इंम्पोज करुन तपासले असता सन 2005 साली नमूद जागेवर महानगरपालिकेने बांधलेल्या रस्त्यालगत असलेल्या नाल्यालगत काही ठिकाणी तुरळक प्रमाणात कांदळवनाची (अवेसिनिया मरीना, अवेयिनया ऑफिसिनेलिस) झाडे दिसून येत आहे, तसेच सदर ठिकाणी सर्व परिसरात अनधिकृत चाळींचे बांधकाम झालेले दिसून आले.
7. तरी वनक्षेत्रपाल ठाणे (कांदळवन) यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र क्र. तक्रार/479, दिनांक.23/09/2022 अन्वये अपर तहसिलदार, मिरा- भाईंदर यांना त्याबाबत कळविलेले आहे. सोबत छायांकित प्रत अवलोकनार्थ जोडली आहे. त्यामुळे या विभागाकडील सदरची तक्रार निकाली काढण्यात यावी, हि विनंती.

वनसंरक्षक कांदळवन कक्ष
क्र 491
8/12/2022
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

(एम.आदर्श रेड्डी)
विभागीय वन अधिकारी
मुंबई कांदळवन संधारण घटक

प्रतिलिपी — मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,कांदळवन कक्ष,मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
प्रतिलिपी — सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

Mangrove committee